( पोपट म्हसे वि. संदिप म्हसे)

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची शपथेवर साक्ष**

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,

माझे नाव - **बाळासाहेब मच्छिंद्र गायकवाड**

वय - ५६ वर्षे, व्यवसाय – शिरस्तेदार,

नेमणुक- उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, नेवासा.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एम. देशमुख यांच्यामार्फत :-**

१. मी २०१४ ते २०१७ या कालावधीत उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, राहुरी येथे निमतानदार म्हणून कार्यरत होतो. दिनांक ३०/१२/२०१६ रोजी आमच्या कार्यालयास मौजे शिलेगाव, ता. राहुरी येथील गट क्र. २६९ च्या मोजणीकरिता न्यायालयामार्फत आदेश प्राप्त झाले. त्यानंतर दि. २१/०१/२०१७ रोजी आमच्या कार्यालयामार्फत वादी यांना मोजणी फी भरण्यासाठी पत्र देण्यात आले. आता मला सदर पत्र दाखवण्यात आले, त्यास **निशाणी क्र. ५५** देण्यात येते. वादी यांनी दि. १७/०३/२०१७ रोजी ऑनलाईन मोजणी अर्ज कार्यालयात दाखल केला. आता मला सदर मोजणी अर्ज दाखवण्यात आला, त्यावर अर्जदार म्हणून वादीतर्फे भास्कर सयाजी तांबे यांची स्वाक्षरी आहे. सदर अर्जास **निशाणी क्र. ५६** देण्यात येते. त्यानंतर अर्जदार यांनी मोजणीची फीस भरून चलन दाखल केले. सदर चलनास **निशाणी क्र. ५७** देण्यात येते. त्यावरुन आमच्या कार्यालयामार्फत दि.१८/०३/२०१७ रोजी वादी प्रतिवादी यांना नोटीसी काढण्यात आल्या. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखवण्यात आली. त्यावर आमचे कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी असून सदर नोटीस **निशाणी क्र. ५८** वर आहे, तर १२ पोहच पावत्या **निशाणी क्र. ५९ ते ७०** वर आहे. त्यावरुन दिनांक १८/०४/२०१७ रोजी, मी मौजे शिलेगाव, ता. राहुरी येथे जायमोक्यावर मोजणी करीता गेलो. मोजणीच्या वेळी वादी व प्रतिवादी हजर होते.

त्यानंतर मी उपस्थित पक्षकरांच्या समक्ष हिंडुन पाहणी करून वहिवाटीच्या खुणा चुन्याने करून घेतल्या.

२. मी प्लेन टेबलच्या सहायाने वादग्रस्त मिळकतीचे मोजणी काम केले व उपलब्ध अभिलेखाचे आधारे अर्जदार व लगतचे धारक यांचे समक्ष हद्दीखुणा दाखविल्या. त्यानंतर मी वादी व प्रतिवादी यांचे जबाब नोंदविले. आता मला वादी प्रतिवादी यांचे जबाबाची प्रत दाखविण्यात आला त्यावर वादी व प्रतिवादी व माझी समक्ष म्हणून स्वाक्षरी आहे. सदर जबाब **निशाणी क्र. ७१** वर आहे. त्यानंतर मी पंचांच्या समक्ष पंचनामा केला. आता मला सदर पंचनाम्याची सत्यप्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी व पंचांच्या स्वाक्षरी आहेत, त्यास **निशाणी क्र. ७२** देण्यात येते. त्यावरुन मी मोजणी प्रमाणे नकाशा तयार केला. आता मला सदर नकाशाची 'ब' प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर 'ब' प्रत ही **निशाणी क्र. ७३** वर आहे. सदर मोजणीअंती, गट क्र. २६९ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांची एकत्रित वहिवाट होती. सदर एकत्रित वहिवाटीचे क्षेत्र २ हेक्टर ९५ आर आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे ७/१२ वरील एकत्रित क्षेत्र ३ हेक्टर ९ आर एवढे आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचे ७/१२ नुसार १४ आर क्षेत्र कमी आढळून आले. प्रतिवादी क्र. ७ ते ११ यांचे ७/१२ नुसार २ हेक्टर ७७ आर एवढे क्षेत्र असून प्रत्यक्ष वहिवाटीस २ हेक्टर ५५ आर एवढे क्षेत्र आढळून आले. गट क्र. २६९ मध्ये पोटहिस्सा होवून अभिलेख तयार झाला नसल्याकारणे अतिक्रमित क्षेत्र दाखवता आले नाही. तसेच गट क्र. २६९ मध्ये वहिवाटीचा रस्ता व चारी यांच्यासाठी एकुण ४१ आर क्षेत्र गेलेले आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १२ व १३ तर्फे विधीज्ञ श्री. खपके यांचेमार्फत**

३. प्रतिवादी क्र. १२ व १३ यांना दि. १८/०४/२०१७ रोजीच्या मोजणीची नोटीस दिलेली नव्हती. तसेच नि.क्र. ७१ वरील जबाब व नि.क्र. ७२ वरील पंचनाम्यावर प्रतिवादी क्र. १२ व १३ यांची स्वाक्षरी नाही. चारी व रस्त्याचे क्षेत्र गट क्र. २६९ च्या ७/१२ मधुन कमी झालेले नाही. सदर प्रतिवादी मोजणीला हजर नव्हते. वादीच्या मिळकतीवर कोणत्या प्रतिवादीने कोणत्या दिशेने अतिक्रमण केले हे नि.क्र. ७३ वर नमुद नाही.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १५ व १६ तर्फे विधीज्ञ श्री. बी. एल. ढोकणे यांचेमार्फत**

४. प्रतिवादी क्र. १५ व १६ यांना दि. १८/०४/२०१७ रोजीच्या मोजणीची नोटीस दिलेली नव्हती. तसेच नि.क्र. ७१ वरील जबाब व नि.क्र. ७२ वरील पंचनाम्यावर प्रतिवादी क्र. १५ व १६ यांची स्वाक्षरी नाही. सदर प्रतिवादी मोजणीस हजर नव्हते. वादीच्या मिळकतीवर कोणत्या प्रतिवादीने कोणत्या दिशेने अतिक्रमण केले हे नि.क्र. ७३ वर नमुद नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.03.11 16:54:14 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-११/०३/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.